# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/११/२०१६

**१)संगमत करून किराणा दुकानातील पैशाची चोरी. :–**

दिनांक २५/११/२०१६ रोजी ०३..३०. ते ०४.०० वा. दर. यातील फिर्यादी मोहसीन इद्रीस अकबानी वय २५ वर्ष रा. प्रभात क्र. ०९ लाखनी यांचे किराणा दुकानाचे समोरील शटर्स तोडुन कोणीतरी अज्ञात इसमांनी संगमत करून आत प्रवेश करून ड्राप मधील १०/रू चे २०० नोटा , २०/रू चे १०० ,व ५०/रू चे ६० नोटा व चिल्लर १०००/रू असा एकुन ८०००/रू रक्कम चोरून नेल्याने फियादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५७,३८०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा टेभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) धानाचे पुंजने अज्ञात इसमाने जाळल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/११/२०१६ रोजी ०६.३० वा. दर. यातील फिर्यादी रंजीत दिलीप सेलोकर वय २६ वर्ष रा. आपले शेतामध्ये ४ एकर शेतीचे धान पिकाची कापनी करून पुंजने करून ठेवले असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने कोणीही नसल्याची संधी साधुन धानाचे पुंजने जाळुन अंदाजे २,०००००/–रू चे नुकशान केल्यावरून फिर्यादीने शेतात जावुन पाहणी करून व खात्री करून पो.स्टे.ला येवुन वरून तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा मेश्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी:–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील मृतक भिमराव यशवंत ठाकरे वय ४२ वर्ष रा. लावनी पोस्टे वारासीवनी याने आपले ताब्यातील मोटार सायकल क्र. एम.पी ५०/डीडी १५८२ ही भरधाव वेगाने ,निष्काळजीपने व हयगयीने चालवुन विरूध्द दिशेने येणाऱ्या मोटार सायकल एमएच ३५ डब्लु ०८२१ ला धडक मारून त्यावर बसलेले मोटार सायकल स्वार यांना किरकोड जखमी करून स्वताचे मरणास कारणीभुत होवुन मृतक आरोपीचे मोटार सायकल वर बसलेल्या इसमाला किरकोड जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने मर्ग क्र. १६/१६ कलम १७४ जाफौ चे कागज पत्रावरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी जायले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक २४/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहरनगर, गोबरवाही, साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३५ लिटर हातभट्टी कि. ७१५०/–रू. व ०७ लिटर २०० मिली देशी दारू कि. २००/–रू तसेच असा एकुण कि. ९१५०/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता